


**सुविचार :– आयुष्यात जन्मापासून ते मरेपर्यंत कार्यरत असलेला एकमेव शिक्षक म्हणजेच 'अनुभव'**

Institution has developed its vision and mission.

**Vision** :

"Determined for excellence in Social Work Education".

**Mission** :

We at BPNISW shall work continuously to achieve-

1. To impart quality social work education 2 To introduce newer areas of academic pursuit with grater employability potential
3 To introduce core values of higher education with a view to bring about holistic development to personality
4 Providing Social Work Education for both personal and social transformation
5 Providing means for the up-gradation of skills in order to increase the employability of the college students.

**Core values:**

- An unwavering faith in Human dignity
- An abiding faith in duty towards other individuals and society

## मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रम संपन्न :—

ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज उर्फ वि.वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस ' मराठी भाषा गौरव दिन' **दि. २७/०२/२०१९** ला ठिक १२.०० वाजता साजरा करण्यात करण्यात आला. याप्रसंगी विशेष अतिथी प्रा. डॉ. कोमल ठाकरे, मराठी विभाग प्रमुख, तायवाडे महाविद्यालय कोराडी, कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुनिल कोडापे, महाविद्यालयाच्या मराठी विभाग प्रमुख डॉ. रेखा जगनाळे उपस्थित होत्या. याप्रसंगी डॉ. रेखा जगनाळे यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात मराठी भाषेचा गौरव वाढविण्याचे काम, मराठी माणसालाच करायचे आहे असे सांगून मराठी भाषेचे महत्त्व व माहिती स्पष्ट केली. तसेच त्यांनी इंग्रजीचा सर्वसामान्यांवर पडलेला पगडा व मराठीचा प्राचीन इतिहास सांगत, मराठी म्हणी अनुभवाच्या खाणी आहेत व हया म्हणीची योजना इग्रंजीतून करता येणे शक्य नाही. मराठी भाषेचा विसर मराठी माणसालाच पडत आहे असे सांगितले. डॉ. कोमल ठाकरे यांनी ' आईचे दुध पिता येत नाही म्हणून आईला शिव्या द्यायच्या का? असे सांगुन संत वाङ्‌मयातून आलेली मराठीची थोरवी आणि त्यातुन आधुनिक काळापर्यंतचा मराठी भाषेचा विस्तार कसा होत आला यावर मार्मिक भाषण केले. अध्यक्षीय भाषणातून डॉ. सुनिल कोडापे यांनी सांगितले की आज इंग्रजाळलेल्या या वातावरणात व गोधंळलेल्या परिस्थितीत आपण सगळे आहोत. नेमके कोणत्या भाषेला जीवनात जपायचे हेच कळत नाही असे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रेखा जगनाळे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. राखी जामकर यांनी केले. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे शिक्षक—शिक्षकेत्तर कर्मचारी, कुसुमाग्रजांवर प्रेम करणारे आमचे विद्यार्थी मोठया संख्येने यावेळी उपस्थित होते.





## महाविद्यालयाला नॅक मुल्यांकनांद्वारे 'अ' श्रेणी प्राप्त:—

**दि. 26 आणि 27 फेब्रुवारी 2019** ला नॅक मूल्यांकन National Assessement And Accreditattion Council- NAAC झाले. त्याकरिता **नॅक निरिक्षक चमू डॉ. पी.जी. चेंगप्पा (चेअरमन), डॉ. सी.पी.सिंग (सदस्य), डॉ. निनाद झाला(सदस्य)** यांनी महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन केले. या मूल्यांकनात महाविद्यालयाला **'अ'श्रेणी** प्राप्त झाली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.एस. तुळणकर यांच्या मार्गदर्शनाखाली व नॅक कोआर्डिनेटर डॉ. सिमा लोबो यांचा सहयोगाने नॅक प्रक्रिया यशस्वीपणे पार पडली. या प्रक्रियेमध्ये सर्व प्राध्यापक वर्ग तसेच शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांचे मोलाचे योगदान लाभले होते.



## आजची मराठी समीक्षा याविषयावर शोध निबंध सादर :—

देवगिरी महाविद्यालय औरंगाबाद येथील एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आजची मराठी समीक्षा या विषयावर दि. 28/02/2019 रोजी संपन्न झालेल्या चर्चासत्रात आदिबंधात्मक साहित्य समीक्षा याविषयावर डॉ. रेखा जगनाळे यांनी शोध निबंध सादर केला.



## इजरायल येथील समाजकार्याच्या विद्यार्थ्यांची महाविद्यालयाला भेट :—

दि. 13/02/2019 रोजी इजरायल 'सफायर कॉलेज ऑफ सोशल वर्क, इजरायल येथील विद्यार्थी व त्यांचे मार्गदर्शक यांनी भारतात येऊन भारतातील सर्वेक्षण दरम्यान महाविद्यालयाला भेट दिली.या भेटी दरम्यान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी व प्राध्यापकांशी अभ्यासक्रमातील वेगळेपण काय या विषयावर चर्चा केली. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.एस.तुळणकर व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



## महाविद्यालयात रक्तदान शिबिराचा आयोजन :—

स्व. ईश्वरबाबूजी देशमुख यांच्या तेराव्या स्मृतिदिना प्रित्यर्थ महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेच्या अंतर्गत दि. 06/02/2019 रोजी करण्यात आले होते. यावेळी जीवन ज्योति ब्लड बॅंक ची उपस्थिती होती. या रक्तदान शिबिरात महाविद्यालयीन विद्वार्थ्यांनी व कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य , सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.








## निरोप संमारंभ सत्कार सोहळा :—

दि. 28/02/019 रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.एस.तुळणकर यांच्या निवृत्ती प्रित्यर्थ सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला.

महाविद्यालयाकरिता जवळपास सोळा वर्षे प्रदिर्घ प्राचार्य म्हणून निरालयवृत्तीने, शिस्तीने कार्य केले त्याकार्याकरिता सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## डॉ. अनंत बरडे यांची प्रभारी प्राचार्यपदी नियुक्ती :—

दि. 01/03/2019 रोजी प्रभारी प्राचार्यपदी डॉ. अनंत बरडे यांची नियुक्ती करण्यात आली. 28 फेब्रुवारीच्या पूर्वसंध्येला प्राचार्य डॉ. एल.एस.तुळणकर यांनी प्राचार्य पदाची सूत्रे डॉ. अनंत बरडे यांचा स्वाधीन करीत प्राचार्य पदाचा निरोप घेतला व नवनियुक्त प्राचार्य डॉ. अनंत बरडे यांना शुभेच्छा दिल्या.



## राष्ट्रीय सेवा योजनेचा उपक्रमः—

मतदान जनजागृति कार्यक्रम 02/02/2019 ला महाविद्यालयात **राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमा** अंतर्गत घेण्यात आला. समाजात मतदानाविषयी जनजागृति व्हावी या दृष्टिने समाजकार्य प्रशिक्षणातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावे जेणेकरून मतदानाचे महत्व पटून समाजात कामकरित असताना विद्यार्थ्यांना जनजागृति करता येईल. या कार्यक्रमाला यावेळी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




## एम.एस.डब्ल्यू भाग—2 ची शैक्षणिक सहलीचे आयोजन :—

सत्र 2018—19 मधिल चतुर्थ सेमिस्टर एम.एस.डब्ल्यॅ भाग—2च्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल वर्धा येथे आयोजित करण्यात आली होती. या शैक्षणिक सहलीमध्ये एकुण 40 विद्यार्थी सहभागी झाले होते. याकरिता सहलप्रभारी म्हणून डॉ. अनंत बरडे व सहल प्रभारी डॉ. सिमा लोबो यांची नियुक्ती करण्यात आली होती. या आयोजनात विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभल्यामुळे सहल यशस्वीरित्या पार पडली.

